International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 September – October 2022

# समाज माध्यम आणि वाचन

**आदिनाथ दरंदले[1], डॉ. हेमकांत चौधरी[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
[2]संशोधक मार्गदर्शक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
*Corresponding Author - आदिनाथ दरंदले*
**DOI - 10.5281/zenodo.7223561**

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने | शब्दांचीच शस्त्रे यत्न करू || शब्दचि अमुच्या जीवाचे जीवन | शब्द वाटू धन जनलोका || तुका म्हणे पहा शब्दचि हा देव | शब्देचि गौरव पूजा करू ||*

संत तुकाराम महाराज म्हणतात आमचे घरी शब्द रुपी धन असून ते धन आमचे रत्न आहेत. जसे रत्न चमकदार असते ,व या तेजाने ते परिसर उजळून टाकते तसे हे शब्द रुपी रत्न ज्ञानरुपी तेज निर्माण करते. शब्द हेच धन, रत्न ,शस्त्र , गौरव ,पूजा व देव आहे असे तुकाराम महाराजांचे मत होते. म्हणून महाराज सर्व जणांना ज्ञान संपादन करण्याचे आवाहन करतात आणि हे ज्ञान संपादन करण्यासाठी शब्द म्हणजेच वाचन किती महत्वाचे आहे, हे त्यांच्या वरील अभंगातून विषद करतात. उगवण्यासाठी पेरणे गरजेचे असते. जमिनीत जसे जे बियाणे पेरले ते उगवते ,तसे वाचणारा वाचक ज्या दर्ज्याचे वाचतो त्या दर्जेने तो अभिव्यक्त होत असतो. वाचणे म्हणजे पेरणे आहे तर त्या वाचनातून उर्मी घेऊन अभिव्यक्त होणे म्हणजेच उगवणे असते. लिखाण करणे , इतरांशी दर्जेदार संवाद करणे , वक्तृत्व करणे हे सर्व अभिव्यक्त होण्याचे मार्ग आहेत. जितकं अभिव्यक्त प्रकट व्हावस वाटत तितकं चांगल वाचन आवश्यक आहे. संत रामदास स्वामी वाचनाचे महत्व विषद करताना म्हणतात दिसामाजी काहीतरी लिहावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे.

वाचन संस्कृतीच्या विकासाने व त्याच्या प्रसाराने ज्ञानसंपन्न आणि माहितीसमृद्ध समाज घडवण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. वाचन हे स्वयं-विकासाचे महत्वाचे साधन आहे. मानवी जीवन समृध्द करण्यासाठी वाचन हे खूप महत्वाची भूमिका बजावते. मानवाला त्याची विचारपद्धती बदलायची असेल,त्यात सुधारणा करायची असेल तर त्यासाठी वाचन हि अतिशय महत्वाची बाब आहे. प्रसिद्ध शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम तर पुस्तकांना जिवलग मित्र समजत.ते म्हणत कि पुस्तकांनी आयुष्यभर साथ दिली.त्यांनी मला हात धरून दिशा दाखवली.अनेकदा त्यातील शब्दांनी माझ्यात चैतन्य जागवलं, माझ्या भोवतीच जग समजून घ्यायला मला मदत केली. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम त्यांच्या 'अदम्य साहस' या पुस्तकातील खालील ओळी त्याचं पुस्तक प्रेम दाखवते.

आधी सदि से अधिक का वक्त,
मैने बिताया किताबों के संग

किताब मेरी दोस्त,मेरी हमसफर
किताबों के सहारे
मैंने देखे सपने
सपने बन गए मकसद
किताबों के सहारे बढ़ा हौसला
मकसद पूरा करने का
असफलता के वक्त
किताबों ने बढाई मेरी हिम्मत
किताब मेरी दोस्त,मेरी हमसफ़र
अच्छी किताबें देवदूत बन
मेरी लिए पैगाम लायी
मेरे दिल को हौले से सहलाया
इसलिये मैं अपने युवा साथीयों से
कहता हूँ - किताबों से दोस्ती करों
ये हैं तुम्हारी अच्छी दोस्त,हमसफ़र
किताब मेरी दोस्त,मेरी हमसफ़र

मनुष्य वाचन तीन कारणांनी करत असतो.

१. आपल्या व्यवसायासाठी आवश्यक ज्ञान प्राप्त करणे.
२. रिकाम्या वेळेत आनंदासाठी
३. आत्मिक उन्नतीसाठी

जीवनात ज्ञान आणि आनंद मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत. परंतु त्यातील राजमार्ग म्हणजे पुस्तक वाचन, जे सर्वांना सहज शक्य आणि परवडणारे आहे. पुस्तक वाचनाने माणसाच्या व्यक्तिमत्वावर सकारात्मक परिणाम होतो. चांगली कादंबरी,पुस्तके वाचनामुळे मनुष्य हा संवेदनशील, सहानुभूतीपूर्ण होतो. वाचनामुळे त्याला दुसऱ्याच्या दृष्टीकोनातून बघण्याची सवय लागते. कादंबरी वाचन हा मानवी मेंदूसाठी खूप चांगला वैचारिक आणि भावनिक व्यायाम असतो. त्यातून त्याला लिहिण्याची आणि बोलण्याची उर्मी निर्माण होते. कोरोना महामारीच्या काळात सर्व व्यवहार बंद असताना काही देशांनी पुस्तकांची दुकाने उघडी ठेवण्यास व पुस्तकांची विक्री करण्यास परवानगी दिलेली दिसून येते. ईशा फौडेशनचे सद्गुरू म्हणतात कि, वाचन हि एक सवय आणि संस्कृती म्हणून जोपासणे अतिशय आवश्यक आहे.वाचनामुळे तुमच्या मनाला आणि तुमच्या अंतर्दृष्टीला एक अतिशय वेगळ्या प्रकारचा व्यायाम घडतो.एका ठिकाणी बसून वाचन केल्यास मन अधिक शांत व विवेकी बनते.

**डिजिटल क्रांती आणि वाचन :**

अलीकडील काळात झालेली डिजिटल क्रांती मुळे पारंपारिक वाचन संकृतीमुळे तडा जातोय काय अशी परिस्थिती निर्माण होण्यास सुरवात झाली आहे. “भारत हि जगातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. जगातील एकूण विक्रीपैकी दहा टक्के मोबाईल फोन एकट्या भारतात विकले जातात.”[1] आज देशातील प्रत्येक वयाच्या व्यक्तीच्या हातात मोबाईल फोन आलेला दिसून येतो आहे. मोबाईल फोन खरतर संवादासाठी अत्यंत प्रभावी आणि उपयुक्त असे साधन आहे. संशोधने सांगतात कि ,भारतातील लोक दिवसातील दोन तासांपेक्षा अधिक वेळ मोबाईल फोनवर इंटरनेट द्वारे माहिती शोधण्यासाठी घालवतात. इंटरनेट वरून दर्जेदार किती माहिती प्राप्त होते. त्यातून ती पाहणाऱ्या व्यक्तीचा किती बौद्धिक ,सामाजिक व आर्थिक विकास होतो हा संशोधनाचा विषय आहे.

**समाज माध्यम आणि वाचन :**

समाज माध्यम हे इंटरनेटद्वारे संचालित होणारे साधन आहे. ,जे व्यक्ती किंवा व्यक्ती गट यांना माहिती तयार करणे आणि संप्रेषित करणे यासाठी उपयोगी आहे. लोक या समाजमाध्यमाचा वापर करून आपल्या आवडी निवडी

,कल्पना,नवनिर्माण ,भाव-भावना यांची आपआपसात देवाण घेवाण करत असतात. समाजाला एका विशिस्ट हेतूसाठी प्रेरित करण्यासाठी समाज माध्यम हे अतिशय महत्वाचे आणि उपयोगी साधन आहे. आणि वाचन म्हणजे शब्द समजून घेऊन त्याचा उपयोग आपले ज्ञान वाढवण्यासाठी, वैयक्तिक व सामाजिक समस्या सोडवून वैयक्तिक व सामाजिक प्रगती साधण्यासाठी करणे होय. त्यामुळे समाज माध्यमे आणि वाचन या परस्परावर अतिशय प्रभाव टाकणाऱ्या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. समाज माध्यमे योग्य रीतीने व योग्य वेळेस वापरले तर ते वाचनासाठी पूरक ठरू शकते ,परंतु जर अभ्यासाच्या वेळेस समाज माध्यमाचा अतिरेकी वापर केला तर त्यामुळे अभ्यासाच्या वाचनात मोठा अडथळा येऊ शकतो.

**समाजमाध्यमाचा वाचनासाठी होणारा उपयोग :**

इंटरनेट आणि समाजमाध्यम यांचा वाचनावरचा काही विपरीत परिणामअसला तरी काही सकारात्मक बाबी देखील आहेत. समाजमाध्यम जर योग्य पद्धतीने वापरले तर, नक्कीच फायदेशीर होतो. YouTube,Wikipedia,WhatsAPP, Facebook, हि समाजमाध्यमे आता सर्वव्यापी झाली आहेत. बहुतेक वृत्तपत्राची फेसबुक पेज Facebook आणि Twiter-Handle आहेत. "WhatsAPP, Facebook या समाजमाध्यमामुळे पुस्तकांबद्दलची माहिती सर्वदूर पोहचवणे खूप सुलभ झाले आहे."[2] वाचाकांजवळ पुर्वीइतका वाचनासाठी वेळ उपलब्ध नसला तरी प्रत्येकाच्या हातातील मोबाईलवरून ब्लॉग्स, समाजमाध्यमावरील लिखाण, तसेच ई-बुक्स वाचनाचे प्रमाण देखील लक्षणीय वाढले आहे. समाजमाध्यमाचा वापर पुस्तकांचे मार्केटिंग करण्यासाठी होऊ शकतो.

**समाजमाध्यमामुळे वाचनाचा होणारा तोटा :**

समाजमाध्यमे वाचनासाठी मदत करतात, परंतु त्यांचा वाचनात अडथळा देखील येतो हे देखील संशोधनांती सिद्ध झालेले आहे. "समाज माध्यमावर घालवलेला वेळ आणि वाचन सवय यांच्या मध्ये सहसंबंध आहे.नियमितपणे व सारखे-सारखे सामाजमाध्यमावर वेळ घालवलेल्या मुळे नक्कीच दर्जेदार वाचन हे कमी होते.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समाजमाध्यमांचा कमीत कमी वापर करण्यासंदर्भात सुचवावे,जेणेकरून ते अधिकाधिक दर्जेदार वाचनाकडे वळतील."[3]

"संगणक, मोबाईल फोन यांचा वापर दर्जेदार वाचन करण्यापेक्षा गेम खेळणे, व्हीडीओ पाहणे याकडे जास्त कल वाढलेला दिसून येतो. या फुटकळ सवयीमुळे दर्जेदार वाचन राहून जाते हे नक्कीच."[4] मोबाईल फोनचा वापर अलीकडे सामाजमाध्यमाद्वारे मेसेजेस पाठवण्यासाठी मोठ्याप्रमाणात केला जातो. इंटरनेटच्या माध्यमातून केवळ WhatsAPP नाही तर इतरही APPs जसे Facebook ,Instagram, आणि S.M.S. या माध्यमातून लिखित संदेश तयार करून संप्रेषित केले जातात. हे संदेश तयार करताना मोठ्या प्रमाणात शब्दांची तोडातोड केली जाते. या संदेशामध्ये थोडक्या शब्दामध्ये जास्त संदेश तयार करावयाचा असल्याने इमोजी मेसेजेस वापरले जातात. अशा या "शब्दांच्या तोडतोडीमुळे व इमोजीच्या वापरामुळे भाषेचे काय होणार? हा प्रश्न निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. नवीन पिढी कदाचित या अशा मोबाईल फोनच्या अतिरेकी वापरामुळे भाषेतील शब्द विसरू शकतील."[5] तंत्रज्ञानावर आधारित उपकरणांच्या अति वापरामुळे काही मानसिक परिणाम होत असतात.त्याला

टेक्नोफरन्स म्हटले जाते. टेक्नोफरन्समुळे नियमित अभ्यासावर, वाचनावर विपरीत परिणाम होतो. डेव्हिड क्रिस्टल यांच्या Texting- The Great Debate या पुस्तकातील संदर्भानुसार लिखित संदेश वापरामुळे जगभरातल्या काही भाषांच अंग्लभाषीकारण होत चालले आहे.समाज माध्यमाच्या वापरामुळे भाषेचा वापर व्याकरणदृष्ट्या योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे.

**समारोप :**

इंटरनेट आणि त्याच्या सहाय्याने चालणारी समाजमाध्यमे हि योग्य पद्धतीने वापरली तर त्याचा नक्कीच वाचनासाठी योग्य उपयोग होऊ शकतो. खरतर आजच्या काळात समाजमध्यमा शिवाय राहणे मनुष्यास अशक्य झालेले आहे. इंटरनेट हे संवादाचे अविभाज्य घटक बनलेले आहे. इंटरनेटमुळे संदेशवहनात गती आलेली आहे. परंतु त्याचा वापर करणाऱ्यांनी तारतम्य ठेवणे गरजेचे आहे. पुस्तकवाचन करणे हे ज्ञान मिळविण्याचा राजमार्ग आहे. हा राजमार्ग कोणत्याही आर्थिक परिस्थितीतील मनुष्यास योग्य आहे.इंटरनेट हे पुस्तकांसाठी सहाय्यकारी होऊ शकते,परंतु पुस्तकवाचनाची जागा इंटरनेटवरील शब्दांना कधीही भरून काढता येणार नाही हे नक्की. खरतरं पुस्तकाचे वाचन हा छंद एक वेगळाच आनंद देणारा आहे. परंतु आजकाल इंटरनेट चा वापर करून किन्डल सारखी वापरली जाणारी नवीन माध्यमे देखील वापरून वाचनाचा आनंद जोपासला तरी त्यात गैर काही नाही, फक्त दर्जेदार वाचनाचा व्यासंग निर्माण व्हावा,हे महत्वाचे.

**संदर्भ:**


१. साठ्ये,केशव (२०१८,जुलै २०). डिजिटल महामार्गावरील धोक्याची वळणे.सकाळ वृत्तपत्र.
२. भांड,साकेत बाबा (२०१८,एप्रिल २२). पुस्तकांना काही सांगायचं.सकाळ वृत्तपत्र.
३. Micheal Owusu-Acheaw (2016). Social media usage and its impact on reading habits : a study of Koforidua polytechnic Student. International Journal of Social Media and Interactive Learning Environments.3(4),211-222.
४. Igbokwe & Obidike (2012). Influence of Electronic Media on Reading Ability on School Children.Library Philosophy and Practice.
५. http://www.klibjlis.com/3.2.3.pdf
६. बोराटे,योगेश ( २०१८,एप्रिल २९). शब्दांचं नव महाजाल.सकाळ वृत्तपत्र.
७. कलाम,ए.पी.जे.अब्दुल (२०१४). अदम्य साहस: राष्ट्रपती अब्दुल कलाम का प्रेरणादायक जीवन-दर्शन.: Rajpal & Sons, New Delhi.